आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६

ठळक बातम्या

1. नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध; नागपूरला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्याचं वचन.

2. राज्यात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला; भाजपचे खासदार मनोज तिवारी यांच्या आज नागपुरात ३ प्रचार सभा.

3. सोमनाथ स्वाभिमान पर्वात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग.

4. न्यूझीलंड विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात विजयासाठी भारतापुढे ३०१ धावांचं लक्ष्य.

भाजप पक्षाचा वचननामा

नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीकरिता भाजप पक्षाचा वचननामा आज स्थानिक हॉटेल इम्पेरियल तुली रामदास पेठ येथे भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे, शहराध्यक्ष दया शंकर तिवारी तसच भाजप कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध झाला. भाजपच्या जाहीरनाम्यात नागपूर शहर विश्वस्तरीय करण्याकरिता शहरात ई लायब्ररी, तुकडोजी चौक ते बेसा उड्डाणपूल,गिट्टी खदान चौक ते काटोल नाका चौक उड्डाणपूल, चार स्तरीय वाहतूक, मेट्रोच्या धरतीवर स्काय बसची सुविधा अशा विविध प्रकल्प आणि योजनांच आश्वासन देण्यात आल आहे. नागपुरातील युवकांना कौशल्य आणि रोजगार संधी उपलब्ध करून देण, स्टार्टअप आणि अन्य क्षेत्रांसाठी ई लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण, प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाचा कृती आराखडा, वोकल फोर लोकल आणि आत्मनिर्भर भारत संकल्पनेला प्रोत्साहन आदी बाबींचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

प्रचारसभा

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला आहे. विदर्भातील वेगवेगळया शहरांत भाजप, काँग्रेस आणि इतर पक्ष प्रचार सभा घेत आहेत. भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंद्रपूरमध्ये विजय संकल्प यात्रा केली. १५ तारखेची निवडणूक हि १२४ योजनांची असून भाजप त्याद्वारे शहराचा कायापालट करेल असं आश्वासन त्यांनी यावेळी उपस्थितांना दिलं.....

त्याचप्रमाणे आज भाजप नेते हंसराज अहीर, आमदार किशोर जोरगेवार आणि उमरखेडचे आमदार विजय खडसे, युवा नेते रघुवीर अहीर, भाजपा-शिवसेना महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी चंद्रपुरात विठ्ठल मंदिर आणि एकोरी प्रभागात प्रचार रॅलीत सहभागी होऊन महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याच आवाहन केल. तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अकोल्यात प्रचार सभा घेतली. आमचा, लाडकी बहीण योजनेला विरोध नाही, मात्र निवडणुका जिंकण्यासाठी लाडक्या बहिणींचा वापर भाजपकडून होत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी यावेळी केला. AIMIM हा पक्ष भाजप सोबत संगनमत करून मुस्लिम मतांचं विभाजन करण्यासाठी काम करत असल्याची टीका देखील त्यांनी पत्रकारांशी बोलताना केली. भाजपचे स्टार प्रचारक, प्रसिद्ध भोजपुरी अभिनेते आणि खासदार मनोज तिवारी आज नागपूर शहरात भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत आज शहरात तीन भव्य जाहीर सभांच आयोजन करण्यात आल आहे. मनोज तिवारी यांची पहिली सभा संध्याकाळी ६:३० वाजता उत्थान नगर, ७:३० वाजता सुरेंद्र गड येथे दुसरी सभा ,तर काशीनगर येथे रात्री ९ वाजता तिसरी सभा संपन्न होईल. दरम्यान, केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते नितीन गडकरी यांनी मागील दोन दिवसांत तब्बल ११ बैठका आणि सहा जाहीर सभा घेतल्या.आज त्यांच्या ५ बैठका आणि तीन जाहीर सभा होणार आहेत. तर उद्या सायंकाळी सात वाजता एनआयटी बगीच्या सक्करदरा इथं अभिनेत्री गिरिजा ओक गोडबोले या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. काल नागपूरात ताजबाग येथे एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी जाहीर सभा घेतली. नागपुरात जिथे कुठे मुस्लिम अल्पसंख्यांक समाज आहे तिथे सिमेंट रोड, सर्व्हिस लाइन अशा सुविधा नाहीत असा आरोप त्यांनी केला.

<u>पंतप्रधान नरेंद्र मोदी / सोमनाथ</u>

'सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पुर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे'. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या सोमनाथ इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.......

*1000 साल बाद भी सोमनाथ महादेव के मंदिर पर फहरा रही ध्वजा पूरी सृष्टि का आह्वान कर रही है। प्रभास पाटन तिर्की से मिट्टी का कण कण में शौर्य, पराक्रम और वीरता का साक्षी*

*है सोमनाथ के इस स्वरूप के लिए कितने ही शिवभक्तों ने संस्कृति के उपासकों ने, संस्कृति के ध्वज धारकों ने अपने प्राणों की आहुति दी।*

त्या आधी सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्य यात्रा निघाली. यानंतर त्यांनी राजकोटमधे मारवाडी विद्यापीठात आयोजित 'सौराष्ट्र - कच्छ व्हायब्रंट समिटचं' उद्घाटन केलं. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात उद्या अहमदाबाद इथं द्विपक्षीय चर्चा होणार आहे. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आणि संरक्षण क्षेत्राविषयी यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

<u>ग्रामपंचायत निवडणूक</u>

फेब्रुवारी अखेर राज्यातील 14 हजार 234 ग्रामपंचायतीची मुदत संपणार आहे. त्यामुळे त्या ग्रामपंचायतींना पुढील निवडणूक होईपर्यंत मुदतवाढ द्यावी, अथवा विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त कराव, अशी मागणी सरपंच परिषदेन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली.

<u>मतदान जागृती</u>

'संकल्प करू छान, चुकणार नाही मतदान, मान है, पहचान है, मतदान लोकशाही की शान है', अशा घोषणा देत मनपाच्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे मतदानाची कमी टक्केवारी असलेल्या भागांमध्ये बाईक रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. मनपाच्या उपायुक्त तथा स्वीप नोडल अधिकारी डॉ. रंजना लाडे आणि उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी झेंडी दाखवून या रॅलीचा शुभारंभ केला. ही बाईक रॅली छावणी, पागलखाना चौक, काटोल रोड, लॉ कॉलेज, शंकरनगर चौक, मुंजे चौक, घाट रोड, जगनाडे चौक, दोसर चौक, इंदिरा गांधी रुग्णालय आणि महाविद्यालय, संविधान चौक मार्गे या रॅलीचा समारोप नागपूर महापालिकेच्या मुख्यालयात झाला. अमरावती महानगरपालिका उपायुक्त नरेंद्र वानखेडे यांच्याद्वारे मतदान जागृतीसाठी विशेष गीत तयार करण्यात आले आहे .....

गंगाधर पटणे निधन

नांदेड - ग्रंथालय चळवळीचे नेते, माजी आमदार गंगाधर म्हाळप्पा पटणे यांच वृद्धापकाळान आज सकाळी नांदेडमध्ये एका खाजगी रुग्णालयात निधन झाल. ते ८५ वर्षांचे होते. दिवंगत पटणे यांनी देह दानाचा संकल्प केला होता. त्यामुळे त्यांचा देह नांदेड येथील श्री गुरुगोविंद सिंघजी वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला आहे. विधान परिषद सदस्य म्हणून त्यांनी १९९८ ते २००४ या कालावधीत काम केल आहे. ग्रंथालय चळवळीत त्यांच मोठ योगदान राहिल आहे. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ते अध्यक्ष राहिले आहेत.

महावितरण

इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स ॲण्ड पॉलिसी मेकर्स परिषदेत महावितरणला ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य 'आयपीपीएआय पॉवर अवॉर्ड्स-२०२६' मध्ये विविध सहा पुरस्कारांनी काल गौरविण्यात आल. स्मार्ट ग्रिड, रूफटॉप सोलर, बॅटरी स्टोरेज आणि विद्युत वाहन प्रोत्साहन या गटांत महाराष्ट्रान देशात अव्वल स्थान पटकावल.

क्रिकेट

भारतीय क्रिकेट संघाच्या यंदाच्या हंगामाचा प्रारंभ आज वडोदरा इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय सामन्यान झाला. आजच्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताच्या संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडने ५० षटकांत ८ गडी गमावून ३०० धावा केल्या आहेत. मालिकेतला दुसरा सामना येत्या बुधवारी १४ जानेवारी रोजी राजकोट इथं, तर तिसरा आणि अंतिम सामना १८ जानेवारी रोजी इंदूर इथं होणार आहे.

हवामान

हवामान! विदर्भात आज सर्वात कमी किमान तापमान गोंदिया येथे नऊ पूर्णांक चार दशांश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ भंडारा आणि यवतमाळ इथे दहा अंश, नागपूर येथे दहा पूर्णांक चार, अमरावती येथे दहा पूर्णांक आठ, गडचिरोली येथे अकरा पूर्णांक दोन, वर्धा येथे ११ पूर्णांक ४ इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान, सर्वाधिक कमाल तापमान अकोला येथे २९ पूर्णांक ६ डिग्री सेल्सिअस नोंदवण्यात आलं आहे. दिल्लीसह उत्तर भारतात अनेक ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.